Ph.No. : (0721) 2573027,2572577 Website : www.jdroamt.org
Email: roamravati@dtemaharashtra.gov.in Fax No. : (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रेस नोट/२०२०/१७३८

जाहीरात

दिनांक :१२/१०/२०२१

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रमाकरीता अतिरिक्त प्रवेश फेरी सुचना.

तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांच्या मार्फत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे दोन फेऱ्यानंतर संस्थेमध्ये रिक्त राहिलेल्या जागांकरीता प्रवेशाची अतिरिक्त फेरी खालील संस्थेमध्ये संस्थास्तरावर घेण्यात येणार आहे. तरी सदर प्रवेश फेरी-करीता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या केन्द्रीभूत प्रवेशाकरीता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या मुळ कागदपत्रांसह व विहित शुल्कासह खालील तक्त्यात नमुद दिनांकास प्रवेशाकरीता त्या त्या संस्थेमध्ये हजर रहावे. याआधी इतरत्र प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी प्रोफार्मा **N** सादर करणे आवश्यक राहील.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | प्रवेश फेरीचे स्थळ | अतिरिक्त प्रवेश फेरीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती, डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित) | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | १४/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |
| २. | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | संबंधीत संस्थेत | १४/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |
| ३. | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम<br>शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | संबंधीत संस्थेत | १६/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |
| ४. | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापूर<br>शासकीय तंत्रनिकेतन, अचलपूर | संबंधीत संस्थेत | १८/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |
| ५. | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती (फक्त औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम) | संबंधीत संस्थेत | १६/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |
| ६. | गितादेवी खंडेलवाल इन्स्टिट्युट ऑफ फॉर्मसी, डाबकी रोड, गोडबोले प्लॉट, अकोला (अनुदानित) (फक्त औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम) | संबंधीत संस्थेत | १८/१०/२०२१ | सकाळी १०.३० वाजता |

सदर फेरीनंतरही उर्वरित शिल्लक जागा असल्यास वरील सर्व संस्थांमध्ये **दिनांक २०/१०/२०२१** रोजी अंतिम अतिरिक्त प्रवेश फेरी राबविली जाणार आहे.

तरी सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे व कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधीत संस्थेशी संपर्क साधावा. रिक्त जागांचा तपशिल व विहीत केलेले शुल्क संबंधीत संस्थेच्या संकेतस्थळावर (website) वर उपलब्ध करुन दिलेले आहे.

**प्र सहसंचालक तंत्रशिक्षण, अमरावती**